विद्यमान महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेबाबत

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः मफुयो-२०१७/प्र.क्र.२३९/आरोग्य-६**
गो.ते. रुग्णालय आवार, १०वा मजला,
नवीन मंत्रालय, मुंबई -०१
**दिनांक: १७ जानेवारी, २०१८**

वाचा :-

१) सार्वजनिक आरोग्य विभाग,शासन निर्णय, क्र रागांयो-२०१०/प्र.क्र.२४०/आरोग्य-६, दिनांक ३१ मे, २०११
२) सार्वजनिक आरोग्य विभाग,शासन निर्णय, क्र. रांगायो-२०१६/प्र.क्र.६४/आरोग्य-६, दिनांक ४ ऑगस्ट, २०१६
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय, क्र. रांगायो-२०१६/प्र.क्र.६४/आरोग्य-६, दिनांक २९ सप्टेंबर, २०१६
४) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय, क्र.रागांयो-२०१६/प्र.क्र.६४/भाग-१/आरोग्य-६, दिनांक १ डिसेंबर, २०१६
५) सार्वजनिक आरोग्य विभाग,शासन निर्णय, क्र. रागांयो-२०१६/प्र.क्र.६४/भाग-१/आरोग्य-६ , दिनांक १३ एप्रिल, २०१७
६) सार्वजनिक आरोग्य विभाग,शासन निर्णय,क्र. रांगायो-२०१६/प्र.क्र.६४/भाग-१/आरोग्य-६, दिनांक ३० जून, २०१७
७) सार्वजनिक आरोग्य विभाग,शासन निर्णय,क्र. रांगायो-२०१६/प्र.क्र.६४/भाग-१/आरोग्य-६, दिनांक १७ ऑक्टोंबर, २०१७
८) राज्य आरोग्य हमी सोसायटी, वरळी,मुंबई यांचे पत्र क्र.राआहसो/कक्ष १/टे १ /३०३७ भाग चौथा/मुदतवाढ/२०३३/२०१७, दिनांक २९ डिसेंबर,२०१७
९) राज्य आरोग्य हमी सोसायटी, वरळी,मुंबई यांचे पत्र क्र.राआहसो/कक्ष १/टे १ /३०३७ भाग चौथा/इतिवृत्त/४९/२०१८, दिनांक ११ जानेवारी,२०१८

**प्रस्तावना :-**

दिनांक ७ जुन, २०१६ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयानुसार संदर्भाधीन क्र. २ येथील दिनांक ४ ऑगस्ट,२०१६ च्या शासन निर्णयान्वये महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना संपूर्ण राज्यात राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेच्या स्वरुप व व्याप्तीच्या अनुषंगाने योजनेच्या अंमलबजावणीकरीता प्रशासकीय बाबी पूर्ण करण्याची प्रक्रिया प्रगतीत आहे. विद्यमान महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेस संदर्भाधिन क्र. ७ येथील दिनांक १७ ऑक्टोंबर,२०१७ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेली मुदतवाढ दिनांक ३१.१२.२०१७ रोजी संपुष्टात आल्याने सुधारीत महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना अंमलात येईपर्यंत किंवा एक वर्ष ( दिनांक १.०१.२०१८ते दिनांक ३१.१२.२०१८)

यापैकी जे आधी होईल त्या कालावधीपर्यंत विद्यमान महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेस मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या संदर्भाधिन क्र.२ येथील दिनांक ४ ऑगस्ट, २०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदी / निकषानुसार योजनेच्या अंमलबजावणीकरीता प्रशासकीय बाबी पूर्ण करण्याची प्रक्रिया प्रगतीत आहे. दरम्यानच्या कालावधीत लाभार्थ्यांच्या विमा संरक्षणामध्ये खंड पडू नये, म्हणून सुधारीत महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना अंमलात येईपर्यंत किंवा एक वर्ष ( दिनांक १.०१.२०१८ते दिनांक ३१.१२.२०१८) यापैकी जे आधी होईल त्या कालावधीपर्यंत विद्यमान महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेस मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. विद्यमान महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या मुदतवाढीच्या कालावधीत म्हणजेच सुधारीत महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना अंमलात येईपर्यंत किंवा एक वर्ष ( दिनांक १.०१.२०१८ते दिनांक ३१.१२.२०१८) यापैकी जे आधी होईल त्या कालावधीपर्यंत योजनेच्या सर्व लाभार्थी घटकांसाठी प्रतिकुटुंब प्रतिवर्ष रुपये ६९०/- (रूपये सहाशे नव्वद फक्त) (जीएसटी रहित) या सुधारित दराने विमा हप्ता विमा कंपनीस अदा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या सहमतीने तसेच वित्त विभागाने त्यांचा अनौ.संदर्भ क्र. १७/२०१८/व्यय-१३, दिनांक १२.०१.२०१८ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०१८०११७१४०१५१५८१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Kulkarni Ganesh Sumant

Digitally signed by Kulkarni Ganesh Sumant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d4d76b301e251c5f7ba36ba636f5f4f44c75a4c25f7122649b483210145f7ff, serialNumber=e26a15ff2751ea792b473fdd01177d621d09128ec76f23e65c637ba7125b22c7, cn=Kulkarni Ganesh Sumant
Date: 2018.01.17 16:52:45 +05'30'

**(ग.सु.कुलकर्णी)**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

मा. मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

मा.राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

सर्व मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्य, विधानमंडळ, विधानभवन, मुंबई- २१
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
विभागीय आयुक्त (सर्व)
आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान
मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी,वरळी, मुंबई
उप महासंचालक, आधार (यु.आय.डी), टेलिफॉन एक्चेंज बिल्डींग, कफ परेड, मुंबई
आयुक्त, महानगरपालीका(सर्व)
अतिरीक्त आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालीका, मुंबई
जिल्हाधिकारी(सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद (सर्व)
सह सचिव / उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई
संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
संचालक (वैद्यकिय), बृहन्मुंबई महानगरपालीका, मुंबई
सहसंचालक/ उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळे (सर्व)
जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व)
जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)
नियंत्रक, शिधावाटप, मुंबई
जिल्हा पुरवठा अधिकारी (सर्व)
जिल्हा माहिती अधिकारी (सर्व)
अधिष्ठाता, शासकीय वैद्यकिय महाविद्यालये व रुग्णालये (सर्व)
भारतीय जनता पक्ष , महाराष्ट्र प्रदेश , वसंतराव भगवान चौक, नरीमन पाईंट , मुंबई-२०
शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर मुंबई- २८
इंडीयन नॅशनल कॉग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉग्रेस (आय)समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई
राष्ट्रवादी कॉग्रेस पक्ष, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पाईंट मुंबई- २१
बहुजन समाज पक्ष, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई ४०० ००१
भारतीय कम्युनिस्ट पक्ष, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस. व्ही. पटेल रोड, मुंबई ४०० ००४
भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई -१३
निवड नस्ती (आरोग्य-६)